## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :- १४४/२०२२/जळगाव**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. रविंद्र रुपचंद कोळी,<br>रा. मु. पो. वाल्मिक नगर, पक्की चाळ,<br>आसोदा रोड, मु.पो. ता.जि. जळगांव. | निवासी नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, जळगांव,<br>ता.जि. जळगाव. |

**सुनावणी दिनांक ३१/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक २७/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३१/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. २५२१/२०१८/जळगाव संदर्भात दिनांक ०६/०९/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जळगांव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी."

४) आयोगाकडे उपलब्ध कागदपत्रे व झालेला युक्तीवाद विचारात घेता, आयोगाने द्वितीय अपिल क्र.२५२१/२०१८/जळगाव संदर्भात दि.०६/०९/२०२१ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना अद्याप कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जळगांव यांनी द्वितीय अपील क्रमांक. २५२१/२०१८/जळगाव मध्ये आयोगाने दिनाक ०६/०९/२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. २५२१/२०१८/जळगाव संदर्भात दि ०६/०९/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जळगाव यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी

आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह सदरची तक्रार क्रमांक २५२१/२०१८/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

प्रत — माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, जळगाव, ता.जि. जळगांव.

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

---

आो-२४५६

11 SEP 2024